# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:21.08.2025** **वार:गुरुवार**

---

•कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकण्डक्टींग आणि सिलिकॉम क्षेत्रात आवश्यक मनुष्यबळाच्या जोरावर आपण वर्चस्व गाजवू शकतो, मुख्यमंत्र्यांचा विश्वास

•पुणे विद्यापीठ चौकातील बहुप्रतीक्षित दुमजली पुलाची एक मार्गिका सुरु

•आयआयएम आणि ऑनलाइन गेमिंग विधेयकं लोकसभेत मंजूर आणि

•९ ऑगस्टपासून १९ जिल्ह्यांच्या १८७ तालुक्यांमध्ये अतिवृष्टी, ८ लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचं नुकसान, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई आणि मदत त्वरित देण्याच्या सूचना

**एमकेसीएल**

**Intro :**

भविष्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकण्डक्टींग आणि सिलिकॉम या तीनही तंत्रज्ञानामध्ये आवश्यक असणारं मनुष्यबळ आपल्याकडे भरपूर असून ते बळकट करण्याचं काम केलं तर या तीनही क्षेत्रात आपण वर्चस्व गाजवू शकतो असं मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केलं. एमकेसीएल म्हणजे महाराष्ट्र ज्ञान महामंडळाच्या रौप्य महोत्सवी स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ...

**महाराष्ट्रामध्ये सहा-साडेसहा हजार लोकांचं एक जाळं या माध्यमातून उभं राहिलेलं आहे. कोणत्याही क्षणी समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचण्याची यंत्रणा एमकेसीएलच्या माध्यमातून निर्माण झाली आहे. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.**

**एमकेसीएलला पंचवीस वर्षं पूर्ण झाली आहेत. आता यापुढे याहून मोठी आव्हानं स्वीकारायची आणि ती यशस्वीरीत्या पूर्ण करायची हीच वेळ आहे. मला विश्वास आहे की आपण हे निश्चितपणे कराल.**

**आम्ही देखील या आव्हानांचा सामना करत असताना, कार्यपद्धतीत जो काही वाटा उचलायचा असेल तो उचलण्यासाठी नक्कीच अग्रसर राहू.**

**Intro :**

यावेळी प्रमुख पाहुणे आणि एमकेसीएलचे अध्यक्ष डॉक्टर अनिल काकोडकर, संस्थापक डॉक्टर विजय भटकर इत्यादि मान्यवर उपस्थित होते. यावेळी डॉक्टर काकोडकर यांनी राष्ट्राची प्रगती आणि युवा शक्तीला ए-आय सक्षम करण्यासंदर्भात आपले विचार मांडले: ....

**साई-मुख्यमंत्री**

कृत्रिम बुद्धीमत्तेच्या वेगवान लाटेतही यशस्वी होण्याची क्षमता भारतीयांमध्ये आहे. त्यासाठी हे ज्ञान सामान्यजनांपर्यंत पोहोचविणाऱ्या शैक्षणिक संस्थांची आवश्यता आहे. या प्रयत्नात 'साई' ही देशातील यशस्वी आणि पथदर्शक संस्था ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात व्यक्त केला. 'सिम्बायोसिस कृत्रिम बुद्धिमत्ता संस्थेचं उद्घाटन करताना ते बोलत होते. राज्यशासनानं एआय चॅटबॉट्स तयार केले आहेत. त्यामुळं शेतकऱ्यांना कळेल अशा भाषेत शंकांचं समाधान होऊ शकेल. मायक्रोसॉफ्टच्या सहकार्यानं मुंबई, पुणे आणि नागपूर इथं कृत्रिम बुद्धीमत्तेशी संबंधित ३ संस्था सुरू केल्या असल्याची माहिती फडणवीस यांनी यावेळी दिली.

**उड्डाणपुल**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रवेशद्वाराजवळील दुमजली उड्डाणपुलाच्या औंध ते शिवाजीनगर या मार्गिकेचं उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते काल झालं. उर्वरित बाणेर आणि पाषाण बाजूकडील कठड्याचं बांधकाम ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन आहे. मेट्रो आणि उड्डाणपुलासाठी एकात्मिक पद्धत वापरून हा दुमजली उड्डाणपूल तयार करण्यात आला असून या पद्धतीनं बांधलेला शहरातील हा दुसरा उड्डाणपूल आहे.

**राधाकृष्णन**

राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सी पी राधाकृष्णन यांनी काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह केंद्रीय मंत्रिमंडळातले सदस्य उपस्थित होते. राधाकृष्णन हे एक यशस्वी उपराष्ट्रपती ठरतील आणि देशाच्या प्रगतीला त्यांचा मोठा हातभार लागेल असा विश्वास मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात व्यक्त केला आहे.

**विधेयक**

IIM, अर्थात भारतीय व्यवस्थापन संस्था सुधारणा विधेयकाला संसदेची मंजुरी मिळाली आहे. लोकसभेत हे विधेयक आधीच मंजूर झालं होतं. राज्यसभेतही काल त्याला मंजुरी देण्यात आली. बिहारमधल्या मतदार याद्यांच्या पुनरीक्षणासह विविध

मुद्द्यांवर विरोधकांनी संसदेच्या दोन्ही सभागृहात गदारोळ केल्यामुळं कामकाज वारंवार, आणि शेवटी दिवसभरासाठी स्थगित करण्यात आलं.

**गेमिंग विधेयक**

लोकसभेत इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ऑनलाईन सट्टेबाजीवर निर्बंध घालणारं, गेमिंगचा प्रचार आणि नियमन विधेयक लोकसभेत काल मांडलं. ते आवाजी मतदानानं ते मंजूर करण्यात आलं. ई-स्पोर्ट्स, शैक्षणिक आणि सामाजिक गेम्स यासह ऑनलाइन गेमिंग क्षेत्राला चालना देण्याबरोबरच त्यावर नियमन आणणं, हा या विधेयकाचा उद्देश आहे. कोणत्याही प्रकारे ऑनलाईन गेम्सद्वारे सेवा, जाहिरातींच्या रूपाने आर्थिक व्यवहारांवर पूर्ण बंदीची तरतूद या विधेयकात आहे. या विधेयकात तीन वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि एक कोटी रुपये दंड किंवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे

**सद्भावना दिन**

दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांच्या ८१व्या जयंतीदिनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल त्यांना आदरांजली वाहिली. राजीव गांधी यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून साजरी करण्यात येते. मुंबईत,मंत्रालयात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. राजभवनातही राजीव गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आलं.

**<u>पाऊस</u>**

राज्यात ९ ऑगस्टपासून आतापर्यंत १९ जिल्ह्यातील १८७ तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली आहे. या काळात ८ लाखांपेक्षा जास्त हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं आहे. अतिवृष्टीमुळं झालेल्या नुकसानाचे पंचनामे तातडीने पूर्ण करून, जिल्हा प्रशासनानं तत्काळ उपाययोजना करून पीडित शेतकऱ्यांना दिलासा देण्याचं काम करावं. एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, असे निर्देश कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी कृषी आणि महसूल विभागाला दिले आहेत.

बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यानं राज्यात गेला आठवडाभर मुसळधार पाऊस पडत आहे. अतिवृष्टीमुळं अनेक भागात परिस्थिती नियंत्रणाच्या बाहेर गेली आहे. २१ लोकांचा मृत्यू झाला आहे. सोबतच मोठी पशुधनाची हानी झाली असून, घरांचंही मोठे नुकसान झाले आहे. शेतीच्या नुकसानाचे तातडीनं पंचनामे करुन एनडीआरएफच्या निकषांप्रमाणे भरपाई देण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश मुख्यंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारीच दिले आहेत. परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी कृषीमंत्री दत्तात्रय भरणे नुकसानग्रस्त भागांचा सध्या दौरा करत आहेत. सर्वाधिक अतिवृष्टी झालेल्या नांदेड आणि वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना भेटून त्यांच्या व्यथा त्यांनी जाणून घेतल्या.

हिंगोली जिल्ह्यात गेल्या तीन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्याच्या पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. पर्लकोटा नदीला पूर आल्यानं भामरागड गाव पुरानं वेढलं गेलं आहे. इथं चार दिवसांपासून अडकून पडलेल्या चार विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आलं. हे विद्यार्थी दिल्ली इथं होणाऱ्या केंद्रीय परीक्षेसाठी जाणार होते. सांगली जिल्ह्यात काल पावसाचा जोर काहीसा कमी झाल्यामुळ वारणा धरणातून विसर्ग कमी करण्यात आला. मिरजेतील कृष्णा घाट इथं कृष्णा नदीनं इशारा पातळी ओलांडली आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील ७९ बंधारे पाण्याखाली गेल्यानं वाहतूक विस्कळीत झाली असून, तळकोकणाला जोडणाऱ्या कोल्हापूर ते गगनबावडा मार्गावर पाणी आल्याने रस्ता बंद झाला आहे. कोल्हापूर रत्नागिरी मार्गावर केर्ली-केर्ले रोड दरम्यान रस्त्यावर पाणी आल्यामुळे केर्ली-जोतिबा मार्गे वाहतूक वळविण्यात आली आहे.

कृष्णा आणि पंचगंगा नद्यांच्या पाणी पातळी सात फुटाने वाढ झाल्याने श्रीक्षेत्र नृसिंहवाडी इथलं श्री दत्त मंदिर पाण्याखाली गेलं आहे. नाशिक शहरासह घाटमाथ्यावर काल दिवसभर पावसानं जोरदार हजेरी लावली. उजनी आणि वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामधील सततच्या पावसामुळं विसर्ग वाढवण्यात आला असून नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन करण्यात आलं आहे. नगरपालिका प्रशासनामार्फत उपजिल्हा रुग्णालय पंढरपूर इथल्या रायगड भवन इथं एक हजार नागरिकांची राहण्याची आणि भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सातारा जिल्ह्यात पालकमंत्री शंभूराजे देसाई यांनी काल पाटण तालुक्यातील पाटण, हेळवाक इथल्या पूर परिस्थितीची पाहणी केली.

खडकवासला धरणातून काल सकाळी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने पुणे शहरातील नदीकाठच्या वस्त्यांमध्ये पाणी शिरले. 1

**<u>गणेशोत्सव</u>**

यावर्षीच्या गणेशोत्सवात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावरील प्रसंग, ऑपरेशन सिंदूर, स्वदेशी वस्तूंचा वापर, युनेस्कोच्या वारसा स्थळ यादीतील १२ गडकिल्ले, पर्यावरण आदी विषयावर जनजागृती करण्याकरिता गणेश मंडळांना प्रोत्साहन द्यावे, अशा सूचना सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी काल पुण्यात दिल्या. गणेशोत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याच्या अनुषंगाने पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

**<u>रो-रो-कार</u>**

प्रवाशांनी अधिक वेळ देण्याची विनंती केल्यामुळं, कोकण रेल्वे मार्गावर धावणाऱ्या पहिल्या रो-रो कार वाहतूक सेवेसाठी नोंदणीची अंतिम मुदत उद्यापर्यंत वाढवण्यात आली आहे. कोकण रेल्वे मार्गावर कोलाडहून नांदगाव रोड आणि वेर्णा इथं गाड्यांच्या वाहतुकीसाठी ही सेवा असणार आहे.

**<u>वाडा</u>**

जुन्या नाशिकमध्ये पावसामुळे काल रात्री एका जुना वाडा कोसळल्यानं नऊ जण जखमी झाले, यात आठ महिलांचा समावेश आहे. नाशिक शहरातील जुने नाशिक गावठाणात मोठ्या प्रमाणात जुने वाडे असून ते धोकादायक स्थितीत आहेत.

**<u>मुले</u>**

यवतमाळ जिल्ह्याच्या दारव्हा शहरात रेल्वे उड्डाण पुलासाठी खोदलेल्या खड्यात बुडून 4 शाळकरी मुलांचा मृत्यू झाला. दहा ते चौदा वर्षे वयोगटातील ही मुलं आहेत.

**<u>हवामान</u>**

कोकण आणि मध्य महाराष्ट्राच्या घाटमाथ्यांवर तुरळक ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**